सांज दैनिक

# नांदेड मित्र

कार्यकारी संपादक : महेंद्र गायकवाड मो.नं.: ९८६०३६२६७५

वर्ष १५ वे , अंक ४८ वा | नांदेड, गुरुवार दि.०७ ऑक्टोबर २०२४ | Reg.No.MAHMAR/2011/40741 | पाने ४ | किंमत १ रुपये

YEAR 15 , Issue No. 48 | NANDED,Thur 07 November 2024 | Page 4 , | Price 1 Rs

## पंतप्रधानांची पहिली सभा नाशकात!



नाशिक : विधानसभा निवडणुकीसाठी ( २०२४) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पहिली सभा नाशिक मध्ये होत असून या सभेसाठी आणि विकासाला साथ देण्यासाठी म्हणून ढोल ताशा वाजवत सहभागी होण्याचे आवाहन भाजपाचे महानगरप्रमुख प्रशांत जाधव यांनी केले आहे.विधानसभा निवडणुकीसाठी राज्यामध्ये रणधुमाळी सुरू झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राज्यातील पहिली सभा नाशिक मधील तपोवन मैदान येथे उद्या दुपारी बारा वाजता होणार आहे. या सभेसाठी प्रशासनासह पक्षाची तयारी देखील झाली असून लाखोच्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत.याबाबत बोलताना भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी सांगितले की, नाशिक जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून नागरिक या सभेसाठी हजर राहणार आहेत. ढोल ताशाच्या गजरात आणि देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी भाजपला साथ देण्यासाठी म्हणून तसेच नरेंद्र मोदी यांची विकासाची रणनीती आणि त्याचे विचार ऐकण्यासाठी म्हणून नागरिक उपस्थित राहतील यात काही शंकाच नाही परंतु नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.

## शरद पवारांमुळे राजकारणात अन् त्यांच्याच विरोधात बंड

शरद पवारांसोबत जवळीक वाढली अन् राजकारणात प्रवेश केला. राजकारणात येण्यासाठी चांगले सुरू असलेले सुखाचे आयुष्य आणि चांगल्या पगाराची नोकरीही सोडली. शरद पवारांनी राजकारणात येण्यासाठी आग्रह केला. त्यामुळे राजकारणात येण्याचा निर्णय घेतला. राजकारणाचा प्रवासही काही सोपा नव्हता. अनेकदा परीक्षा घेतली गेली. पण त्या प्रत्येक निष्ठेच्या परीक्षेत प्रखरतेने चकाकणारे नेते म्हणजे सुशीलकुमार शिंदे. त्यांनी कोर्टातील शिपाई ते राज्याचे गृहमंत्री असा राजकीय प्रवास केला. १८ जानेवारी २००३ ते ४ नोव्हेंबर २००४ या काळात त्यांना महाराष्ट्राचे १५ वे मुख्यमंत्री म्हणून संधी मिळाली. सुशीलकुमार शिंदे हे पहिले दलित मुख्यमंत्री होते. तसेच, राज्यपाल पद भूषवल्यानंतर सक्रिय राजकारणात परतणाऱ्या नेत्यांपैकी सुशीलकुमार शिंदे हे एक नेते आहेत. चला तर मग जाणून घेऊयात त्यांची राजकीय कारकीर्द...कोर्टातील शिपाई, पोलिस उपनिरीक्षक ते देशाचे गृहमंत्रीसुशीलकुमार शिंदे हे मूळचे सोलापूरचे आहेत. मेलेल्या जनावरांची कातडी काढणे आणि त्यावर प्रक्रिया करणे हा त्यांचा पिढीजात व्यवसाय होता. सामाजिक जीवनात जगत असतांना सुशीलकुमार यांच्यासमोर अनेक चढ–उतारही आलेत. वडिलांचा अकाली मृत्यू झाला. त्यानंतर जातिभेद, पाचवीला पुजलेलं अठारविश्वे दारिद्र्य अशा सर्व अडथळ्यांना पार करत त्यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं. प्रसंगी रात्रशाळेत तर कधी कोर्टात शिरस्तेदार म्हणून नोकरी करून अभ्यास केला. त्यातून ते पोलिस उपनिरीक्षक बनले. मुंबईत सीआयडी ऑफिसर म्हणूनही त्यांनी काम केलं.शरद पवारांमुळे राजकारणात एन्ट्रीया काळात शरद पवार यांनी त्यांची प्रतिभा हेरली. सुशीलकुमार शिंदे यांनी शरद पवार यांना त्यांच्या विद्यार्थीदशेपासून पाहिलं होतं. तसे दोघेही समवयस्क होते.

# महाराष्ट्रासह झारखंडमध्ये पैशांचा पाऊस आणि दारुचा महापूर!

नवी दिल्ली : महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुका तसेच पोटनिवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याची प्रकरणे रोखण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाच्या अखत्यारीतील यंत्रणांनी केलेल्या कारवाईत आत्तापर्यंत ५५८ कोटी रुपये मूल्यांची रोकड,मोफत वाटपा साठी आणलेल्या प्रलोभन पर वस्तू, मद्य, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू जप्त केले आहेत. निवडणुका जाहीर झाल्या पासून केवळ महाराष्ट्र राज्यात केलेल्या कारवाई अंतर्गत सुमारे २८० कोटी रुपये मूल्याचा माल जप्त केला गेला आहे.

तर झारखंडमधूनही आतापर्यंत आणखी १५८ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रात ७३.११ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे, तर ३७.९८ कोटी रुपयांची दारू आणि ३७.७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने ९०.५३ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू आणि ४२.५५ कोटी रुपयांच्या मोफत वस्तू जप्त केल्या आहेत. झारखंडमध्ये १०.४६ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ७.१५ कोटी रुपयांची दारू आणि ८.९९ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाने ४.२२ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू आणि १२७.८८ कोटी रुपयांच्या मोफत वस्तू जप्त केल्या आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी यापूर्वी सर्व अधिकाऱ्यांना निवडणुकीत कोणत्याही प्रकारच्या प्रलोभना बाबत आयोगाची झिरो टॉलरन्सफ राखण्याचे निर्देश दिले होते. त्यांनी अनेक एजन्सींना अवैध दारू, ड्रग्ज, मोफत वस्तू आणि




रोख रक्कम यांचे वितरण आणि हालचाली रोखण्यासाठी संयुक्त पथके तयार करण्यास सांगितले. नुकत्याच झालेल्या बैठकीत मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, उत्पादन शुल्क आयुक्त आणि अंमलबजावणी एजन्सी या दोन्ही निवडणुकांना तोंड देणारी राज्ये आणि त्यांच्या शेजारची राज्ये आणि केंद्र शासित प्रदेश, राजीव कुमार यांनी आंतरराज्यीय सीमेवरील हालचालींवर कडक नजर ठेवण्यावर भर दिला आहे.दोन्ही राज्यांमध्ये यंदा होत असलेल्या निवडणुकांमध्ये २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत एकत्रित जप्तीचे प्रमाण ३.५ पटीने वाढले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात १०३.६१ कोटी रुपये मूल्याचा मुद्देमाल तर झारखंडमध्ये १८.७६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला होता.

## दलित मतांचा १९ विधानसभा मतदारसंघांवर प्रभाव

## दलितांचे अंदाजे मतदान : १.५५ कोटी

दलितांना सामाजिक आरक्षणात १५ टक्क्यांचे प्रतिनिधित्व आहे. हेच सूत्र जर लोकसंख्येसाठी वापरले तर १३ कोटींच्या महाराष्ट्रात दलितांची लोकसंख्या १.९५ कोटी होईल. मात्र, हा मतदार राज्यभरात विखुरलेला आहे. तरीही त्याचा १९ विधानसभांमध्ये थेट प्रभाव आहे. म्हणून सत्ता मिळवण्यासाठी ज्याप्रमाणे मराठा, ओबीसींना गोंजारले जाते त्याचप्रमाणे दलितांनाही विविध योजनांच्या माध्यमातून खुश ठेवण्याचा प्रयत्न सत्ताधारी करतात.राज्यात २९ विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव आहेत. पण या राखीव जागांच्या खेरीज २८८ पैकी १९ विधानसभा मतदासंघांवर दलित समाजाची छाप आहे. विशेषत: विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यांतील ६२ मतदारसंघात कुणबी, मराठा समाजानंतर दुसऱ्या क्रमांकावर दलितांचे मतदान आहे. मुंबईतील ३६ आणि ठाण्यातील १८ अशा ५४ विधानसभा मतदारसंघातही दलित मते महत्त्वाची दिसतात असे लोकसभा निवडणुकांवरून आपल्या लक्षात येते. विदर्भ आणि




मुंबईनंतर राज्यात दलितांचे प्राबल्य मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांत आहे. येथील ४६ विधानसभांमध्ये दलित मते आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न सर्व उमेदवार करतात. नुकत्याच झालेल्या मराठवाड्यातील लोकसभा मतदारसंघात छत्रपती संभाजीनगर वगळता इतर सर्वच ७ ठिकाणी दलित मतांच्या आधारे मविआचे उमेदवार विजयी झाले आहेत. अर्थात दलित मतदान विविध राजकीय पक्षांमध्ये बऱ्यापैकी विभागले गेले आहे. त्यामुळे १९ मतदारसंघात ते अधिक प्रभावी आहे.सहा खासदार दलितांचे१. अमरावती : बळवंत वानखेडे२. शिर्डी : भाऊसाहेब वाकचौरे३. सोलापूर : प्रणिती शिंदे४. रामटेक : श्यामकुमार बर्वे५. लातूर : शिवाजी काळगेहे अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघातून विजयी झाले आहेत, तर उत्तर–मध्य मुंबई हा मतदारसंघ राखीव नसला तरी येथून वर्षा गायकवाड यांनी विजय मिळवला आहे.दलितांमध्ये सर्वाधिक प्रमाण बौद्ध अन् नवबौद्धांचेअनुसूचित जाती हा विविध जातींचा प्रवर्ग आहे. २०११ जनगणनेनुसार अनुसूचित जातींमध्ये वरील ४ प्रमुख जातींचा समावेश आहे. या चार प्रमुख जातींची टक्केवारी ९२ आहे. उर्वरित ८ टक्क्यांमध्ये ढोर, हिंदू खाटीक, कैकाडी, डक्कलवार आदी जातींचाही समावेश आहे. या जातींच्या समूहाला अनुसूचित जाती अर्थात दलित असे संबोधले जाते.

## कोलकाता

## प्रशिक्षणार्थी डॉक्टर बलात्कार–हत्या प्रकरण:सुप्रीम कोर्टाचा खटला पश्चिम बंगाल बाहेर हलवण्यास नकार

कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये ९ ऑगस्ट रोजी झालेल्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणी गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली.सीबीआयच्या अद्ययावत स्थिती अहवालावर सर्वोच्च न्यायालयाने ४ आठवड्यांत उत्तर मागितले आहे. याशिवाय या प्रकरणाची सुनावणी अन्य कोणत्याही राज्यात हस्तांतरित करण्यासही न्यायालयाने नकार दिला आहे.डॉक्टरांच्या सुरक्षेशी संबंधित याचिकेवर एका वकिलाने न्यायालयाला सांगितले की, केंद्र सरकारने नॅशनल टास्क फोर्सचा अहवाल दाखल केला आहे.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला एनटीएफ अहवालाची प्रत या खटल्याशी संबंधित सर्व वकिलांना, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पाठवण्याचे निर्देश दिले.यानंतर सर्व याचिकाकर्ते आणि राज्यांच्या मुख्य सचिवांनी यावर आपल्या सूचना द्याव्यात. त्यासाठी न्यायालयाने तीन आठवड्यांची मुदत दिली आहे.यापूर्वी ४ नोव्हेंबर रोजी पश्चिम बंगालच्या सियालदह न्यायालयाने बलात्कार आणि हत्येचा मुख्य आरोपी संजय रॉयवर आरोप निश्चित केले होते. ११ नोव्हेंबरपासून या प्रकरणाची दररोज सुनावणी होणार आहे.

# सेवा जनशक्ती पक्षाचे उमेदवार मंगेश कदम यांना प्रचंड मताने निवडून द्या- प्रा मनोहर धोंडे

नांदेड : देगलूर–बिलोली विधानसभा राखीव मतदार संघातील सेवा जनशक्ती पक्षाचे उमेदवार मंगेश कदम यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे असे आवाहन सेवा जनशक्ती पक्षाचे प्रमुख तथा शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे सर यांनी देगलूर –बिलोली मतदार संघातील कार्यकर्त्यांना केले आहे. या मतदार संघात मनोहर धोंडे यांना मानणारा मोठा वर्ग आहे.देगलूर – बिलोली राखीव विधानसभा मतदारसंघांचे उमेदवार मंगेश कदम यांना प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या सेवा जनशक्ती पक्षाने पुरस्कृत केले असून मंगेश कदम यांना सर्व जाती धर्मातून वाढता पाठिंबा मिळत आहे.मंगेश कदम गेल्या अनेक दिवसापासून देगलूर –बिलोली मतदारसंघात जोमाने फिरत असून त्यांनी मतदार संघ पिंजून काढला आहे. मतदारसंघात आजी व माजी आमदाराबादल जनतेत रोष दिसून येत आहे. त्यामुळे मतदारसंघात आता जुन्या चेहऱ्याला जनता कंटाळली असून नवीन चेहरा म्हणून मंगेश कदम यांच्या नावाला मतदारांनी पसंती दिली आहे. प्रा. मनोहर धोंडे यांच्या सेवा जनशक्ती पक्षाने मंगेश कदम यांना पुरस्कृत केले असून मनोहर धोंडे यांच्या शिवा संघटनेची मतदारसंघात मोठी ताकद आहे. प्रा. मनोहर धोंडे हे लोहा –कंधार मतदारसंघातून स्वतः. उमेदवार आहेत.त्यामुळे त्यांनी देगलूर–बिलोली मतदारसंघातील जनतेला आवाहन केले आहे. मंगेश कदम यांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे




असे प्रा. मनोहर धोंडे यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे.या प्रसंगी शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा संपर्क प्रमुख अनिल माळगे, उमेदवार मंगेश कदम हे उपस्थित होते.

सांज दैनिक
नांदेड मित्र

गुरुवार दि.०७ ऑक्टोबर २०२४



# मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार बंद

**नांदेड :** लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या दिवशी बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश मार्केट अँड फेअर अॅक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमीत केले आहेत.लोकसभा पोट निवडणूकव विधानसभा सार्वत्रिक निवडणूकी साठी नांदेड जिल्ह्यातील ८३-किनवट,८४-हदगाव, ८५-भोकर, ८६-नांदेड उत्तर,८७-नांदेड दक्षिण,८८-लोहा, ८९-नायगाव,९०-देगलूर व ९१ मुखेड या नऊ विधानसभा मतदार संघात बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मतदान व मतमोजणी दिनांकास जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यास आदेशित केले आहे. बुधवार २० नोव्हेंबर,२०२४ रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या गावांची ठिकाणाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. तालुका हदगाव-मनाठा,किनवट-माळ बोरगाव, मांडवी,माहूर-मौ.दहेगाव, अर्धापूर-कामठा, धर्माबाद-निरंक,नायगाव-सोमठाणा, देगलूर-शहापूर,मरखेल, बिलोली -सगरोळी, मुखेड-जाहुर, दापका गु., सावरगाव पिर, नांदेड- मौ. वाडी अंतर्गत छत्रपती चौक ते डी मार्टपर्यत ,मौ.तरोडा बु. व खु (तरोडा नाका),मुदखेड-निरंक, भोकर-निरंक, हिमायतनगर-हिमायतनगर शहर,उमरी-निरंक, लोहा-सोनखेड, उमरा, कंधार-मौ. बारुळ या ठिकाणची आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार २१ नोव्हेंबर २०२४ रोजी भरविण्यात यावेत.तसेच मत मोजणीच्या दिवशी म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी परिसरात आठवडी बाजार भरत असल्यास याच आदेशान्वये ते बंद करण्यात येत असून हे आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी भरविण्यात यावेत असे आदेश निर्गमित केले आहे.

## विधानसभा निवडणूक पूर्वतयारी आढावा बैठकीत आयोगाचे निर्देश

# आवश्यक निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे : हिर्देशकुमार







**छत्रपती संभाजीनगर :** निवडणूक प्रक्रिया राबवितांना त्यात कोणत्याही शंकेला वाव असता कामा नये याची खबरदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावी व निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांनी आज निवडणूक यंत्रणांना दिले.

येथील स्मार्ट सिटी कार्यालयात छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदार संघांमधील निवडणूक पूर्वतयारी बाबत आढावा बैठक आज पार पडली. या बैठकीस राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम,अति.मुख्य निवडणूक अधिकारी बी.प्रदीपकुमार,उपसचिव सुमनकुमार, संजयकुमार,अभिलाष कुमार,अनिलकुमार, अविनाशकुमार तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना,छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्रा,पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ.विनय कुमार राठोड आदी उपस्थित होते. प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता जपाप्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांनाच सर्व प्रक्रिया राबवावयाची आहे. राबवितअसलेल्या निवडणूक विषयक कामकाजाबाबत प्रत्येक टप्प्यावर राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी व प्रक्रिया राबवावी. त्याचे दस्तऐवजीकरण करावे. त्यांचे शंकानिरसन करावे. निवडणूक प्रक्रिया राबवितांना पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,असे हिर्देशकुमार यांनी सांगितले. मतदान केंद्रांवर सर्व सुविधा पुरवामतदार याद्यांबाबतही योग्य ती काळजी घेऊन त्या याद्या अधिक बिनचूक असाव्यात. प्रत्येक मतदारापर्यंत मतदान चिठ्ठ्या वेळत पोहोचतील याचे नियोजन करा. मतदार याद्यांविषयी असलेल्या तक्रारींबाबत तात्काळ दखल घ्यावी. मतदान केंद्रांबाबतही सर्व यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. प्रत्येक मतदान केंद्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था,तात्पुरत्या मतदान केंद्रांची मान्यता घेणे, मतदान केंद्राचे ठिकाण बदलले असल्यास त्याबाबत मतदारांपर्यंत माहिती पोहोचविणे, त्याची प्रसिद्धी करणे, विशेष मतदान केंद्रांची निर्मिती करणे जसे.पर्यावरण पूरक,महिलांनी, दिव्यांग कर्मचाऱ्यांनी संचलित केलेले इ,मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी,रॅम्प,सावली इ. सुविधांची निर्मिती, तसेच वेब कॅमेरे व सीसीटीव्ही कॅमेरे लावून मतदान केंद्रांचे वेबकास्टिंग करणे,मतदान केंद्राच्या बाहेर व आत कॅमेरे लावावे इ. सुचना दिल्या. तसेच या सर्व सुविधांची पूर्तता झाल्याबाबत व आवश्यकतांबाबत स्वतः जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक,पोलीस आयुक्त यांनी स्वतः पाहणी करुन खातरजमा करावी,असे निर्देशही देण्यात आले. यंदा मतदान हे नोव्हेंबर महिन्यात असून आता सुर्यास्त लवकर होईल,अशा वेळी सायंकाळी मतदान केंद्रांवर पुरेशा प्रकाशासाठी दिवे लावण्याची सुविधा करावी, अशी सुचना देण्यात आली. कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्रात मोबाईल नेता येणार नाही, याबाबत योग्य ती काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले. टपाली मतदान व गृह मतदान प्रक्रियेबाबतही यंत्रणांनी पूर्ण प्रक्रिया व्यवस्थित राबवावी. गृह मतदान कार्यक्रम अगोदर जाहीर करावा. त्याबाबत उमेदवारांना कळवावे. मतदान कर्मचाऱ्यां साठी सुविधा द्यानिवडणूक काम काजासाठी लागणारे पुरेस मनुष्यबळ उपलब्ध असल्याची खात्री करावी. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जेवण,पिण्याचे पाणी,काम काजाची सुविधा,मतदान केंद्रांवर गेल्यावर मुक्काम, मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता, सुरक्षितता,भोजन, पाणी याबाबतची व्यवस्था पुरविण्यात यावी. महिला कर्मचाऱ्यांना विशेष सुरक्षा व सोयी सुविधा द्याव्या. निवडणूक कामकाजात कर्मचाऱ्यांना अचानक उद्भवणाऱ्या आजारांसाठी तात्काळ वैद्यकीय सेवा देण्याचे नियोजन असावे. त्यासाठी स्थानिक पातळीवर रुग्णालयांमध्ये खाटा राखीव ठेवाव्या. प्रत्येक निवडणूक कर्मचाऱ्याची योग्य काळजी घेतली जाईल, याची खबरदारी घ्यावी.सी व्हिजील वरील तक्रारींचे तात्काळ निराकरण कराप्रत्येक जिल्ह्यात व विधानसभा क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यासाठी सर्व संलग्न जिल्ह्यांच्या पोलीस यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवावा. मद्य,अंमलीपदार्थ, मौल्यवान वस्तू,रोकड यांच्या अवैध वाहतुकीवर नजर ठेवून कारवाई करावी. याबाबत सी व्हिजील ॲपवर येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन कारवाई करावी. या तक्रारींचे तात्काळ निराकरण झाले पाहिजे, याबाबत विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले.फेक न्यूजला तात्काळ पायबंदनिवडणूक काळात माध्यमांमध्ये येणाऱ्या बनावट बातम्या,फेक न्यूज अर्थात खोट्या माहितीचे प्रसारण तात्काळ रोखावे. खोटी माहिती असल्यास तिचे प्रसारण रोखून सत्य माहितीचे तात्काळ प्रसारण करावे.याबाबत या विभागाशी संबंधित बातम्या असतील त्यांनी तात्काळ योग्य माहिती पुरवावी व वस्तूस्थिती जनतेसमोर मांडावी, जेणेकरुन निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होणार नाही व त्याबाबत गैरसमज निर्माण होणार नाही.मतदार जनजागृतीवर भर द्यामतदारांचे मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी आयोगा मार्फत लवकरच स्विप उपक्रम मोठ्याप्रमाणावर राबविले जाणार आहेत. ते सर्व उपक्रम आपल्या विधानसभा क्षेत्रात राबवावे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्न करावे. मतदारांना मतदान करणे सोईचे व सुलभ व्हावे यासाठी उपाययोजना राबवाव्या.अचूक आकडेवारी साठी स्वतंत्र नोडल अधिकारीमतदानाचे प्रमाण नेमके कळावे व त्यातील आकडेवारीत अधिक अचूकता यावी यासाठी या निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी विधानसभा मतदार संघ स्तरावर,जिल्हास्तरावर आणि राज्य स्तरावर नेमण्यात येणार आहे. मतदान टक्केवारीची आकडेवारी बुथनिहाय पडताळणी करुन मतदान टक्केवारी अचूक देण्यात येईल यासाठी ही उपाययोजना करण्यात आल्याचेही निवडणूक उपायुक्त यांनी सांगितले.मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनमुख्य निवडणूक अधिकारी डॉ. एस. चोकलिंगम म्हणाले की, राजकीय पक्ष उमेदवारांना वेळोवेळी अद्यावत निर्णय व माहिती देऊन अवगत करावे.मतमोजणी साठी मतमोजणी केंद्राच्या पुनर्रचनेचा आराखडा नव्याने मंजूर करावयाचा असल्यास त्याचे प्रस्ताव तातडीने पाठवावे.टपाली मतमोजणीबाबतच्या व्यवस्थेसह आराखडा मंजूर करावा. निवडणूक कामकाजाविषयी सर्व अहवाल वेळेत व अचूक पाठविणे आवश्यक आहे. त्यात कोणतीही दिरंगाई व हयगय खपवून घेतली जाणार नाही. सर्व आकडेवारी अचूक पाठवावी. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व विधानसभा क्षेत्रातील कामकाजावर लक्ष ठेवावे. पैशांचा वापर. माध्यमांमध्ये येणारी माहिती,आणि असामाजिक तत्वांचा वावर याबाबत सजग राहून वेळीच कारवाई करावी.यांची होती उपस्थितीबैठकीस नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर,लातूरचे जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे,नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत,परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे,बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक,लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे,चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी,गोंदिया जिल्हाधिकारी प्राजित नायर,भंडारा जिल्हाधिकारी संजय कोलते, वाशिम जिल्हाधिकारी बुवनेश्वरी. एस, वर्धा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, गडचिरोली, जिल्हाधिकारी संजय दैने,हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल,धाराशिव जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओबांसे,लातूर महानगर पालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे,नागपुरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंघल तसेच बीड पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ,जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल,नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, धाराशिव पोलीस अधीक्षक संजय जाधव,गोंदिया पोलीस अधीक्षकगोरख भामरे, चंद्रपूर पोलीस अधीक्षक रिना जानबंधू,लातूर पोलीस अधीक्षक सोमय मुंढे,गडचिरोली पोलीस अधीक्षक नीलोत्पल, परभणी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंग परदेशी, हिंगोली पोलीस अधीक्षक एस.डी. कोकाटे, भंडारा पोलीस अधीक्षक नुरुल हसन,वर्धा पोलीस अधीक्षक अनुराग जैन तसेच दुरदृष्य पद्धतीने सर्व जिल्ह्यातील अधिकारी व या निवडणूकीसाठी नेमलेले निवडणूक आयोगाचे निरीक्षक सहभागी झाले होते.

# मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉईटचे उद्घाटन




नांदेड : जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा मुख्यालयाच्या बाजुला रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालयात जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या सहयोगाने मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉइंटचे उद्घाटन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. मतदाराला प्रोत्साहन म्हणून मतदानाच्या बोटाची शाई दाखवा आणि मोफत डोळे तपासणी करून घ्या असा उपक्रम आयोजित केला आहे. यावेळी मोठया प्रमाणात मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. आज वाचनालयाच्या वतीने बाह्यरुग्ण विभागात व लसीकरण केंद्रात रुग्णाला दिल्या जाणाऱ्या पावती व औषधाच्या कागदावर मी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मी मतदान करणार तुम्ही पण करा असा एक शिक्का देण्यात येत आहे. याप्रसंगी नांदेड महानगर पालिका उपायुक्त अजितपाल सिंग संधू, शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी , जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी एस एम पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच के साखरे, स्वीप ८६ नांदेड़ उत्तरचे संभाजी पोकले व सुनिल मुत्तेपवार व रुग्ण सेवा मंडळाचे सहसचिव प्रा. डॉ. बालाजी कतूरवार यांच्यासह वाचक, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बल्क एसएमएस व्हाईस,एसएमएस विनापरवानगी जारी केल्यास कारवाई करणार : जिल्हाधिकारी

## माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीची करडी नजर बल्क एसएमएस संस्थाच्या संस्थाच्या प्रतिनिधी समवेत बैठक

**नांदेड :** नांदेड लोकसभा पोटनिवडणूक २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता सुरु आहे. आचारसंहिता कालावधीत उमेदवारांकडून मतदाराना मतदान करण्याबाबत विना परवानगी बल्क एसएमएस देण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या उमेदवारांना प्रचारासाठी बल्क एसएमएस पाठवायचे आहेत, त्यांनी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीची परवानगी घेवूनच एसएमएस पाठविण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अभिजीत राऊत यांनी केले आहे.निवडणूक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे बल्क एसएमएस, ई–पेपर, व्हीडीओ, ऑडीओ, रेडीओ चॅनेलवरील कोणत्याही जाहिरातीला परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी शिवाय इलेक्ट्रॉनिक्स फॉरमॅटवरील कोणतीही जाहिरात दिल्यास कारवाई केली जाईल.बल्क एसएमएस बाबत उमेदवारांच्या सर्व प्रतिनिधी समवेत उद्या दुपारी १ वाजता माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्यावतीने बैठक आयोजित केली आहे. तरी बल्क एसएमएस, व्हाईस सेवा पुरविणाऱ्या मेसेज एजन्सीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनातील




माध्यम कक्षात बैठकीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी केले आहे.रेडिओ संदेश बल्क एसएमएस बंदीनिवडणूक दिनांकाच्या ४८ तासाच्या शांतता काळामध्ये आकाशवाणी व खाजगी चॅनलवरील निवडणूक विषयीच्या बाबीचे प्रसारण बंद करण्याचे निर्देशही जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. तसेच मोबाईल वरील बल्क एसएमएस सेवाही या काळात बंद ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. ४८ तास आधी मोबाईलवर अशा प्रकारे आदेश आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी एसएमएस सेवा देणाऱ्या एजन्सीची असेल, यांची सर्वानी नोंद घ्यावी असेही आवाहन करण्यात आले आहे.

# गंभीर डेंग्यूवर यशस्वीपणे मात : यशोदा हॉस्पिटलच्या टिमचे सुयश

# अतिगंभीर डेंग्यू रुग्णावर आव्हानात्मक उपचार डॉ.दुर्गेश साताळकर

नांदेड : सिकंदराबाद येथील यशोदा हॉस्पिटलच्या टिमने आपल्या अचूक निदानातून आणि उपचारातून तालुक्यातील नागापूर येथील मूळ रहीवाशी असलेल्या योगेश केरबाजी मस्के या २६ तरुणाचे अतिगंभीर डेंग्यू मधून मुक्तता करून देत त्यास जिवनदान दिले आहे,अतिगंभीर डेंग्यू मध्ये भयंकर तापासोबतच एकाचवेळी किंवा टप्प्याने ईतर शारीरीक अवयव निकामी होण्याच्या धोक्याच्या परिस्थितीतून तरुण रुग्णास मरणाच्या दारातून यशस्वीपणे परत आणत अतिगंभीर परिस्थितीत पोहचलेल्या डेंग्यूवर यशस्वी उपचार करत मोठी ऐतिहासिक कामगिरी पार पाडली आहे अशी माहीती तज्ञ डॉ.दुर्गेश साताळकर, डॉ.मधूसूधन जाजू, डॉ.टि. शशिकांत व यशोदा हॉस्पिटलच्या टिमच्या वतीने पत्रकार परिषेदेत देण्यात आली. या विषयी सविस्तर वृत्त असे की नागापूर ता.नांदेड येथील योगेश केरबाजी मस्के २६ वर्षीय तरुण रुग्णांस भयंकर ताप व अशक्तपणासह या लक्षणांसह अतिगंभीर अवस्थेतील डेंग्यू आजारात यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे ३० मार्च २०२४ रोजी दाखल करण्यात आले होते,सदरील रुग्णाची प्रकृती इतकी गंभीर होती की तो अंथरुणावरुन उठू शकत नव्हता त्यास भयंकर ताप आलेला होता सदरील रुग्णास सुरुवातीला नांदेड येथील स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले होते परंतु परिस्थिी गंभीर झाल्यानंतर सदरील रुग्णास यशोदा हॉस्पिटल येथे आणलेल्या रुग्णाला विलंब न लावता मल्टिसिस्टम इन्व्हॉल्व्हमेंटसह स्कर्व्ह ट्रॉपिकल इन्फेक्शनचे प्रकरण आहे येथील तज्ञ डॉक्टरांनी तातडीने ओळखले.अत्यंत कमी ऑक्सिजन पातळीमुळे रुग्णाला व्हेंटिलेटरची आवश्यकता होती. इनिलटल चाचणीमध्ये गंभीर थ्रोम्बोयटोपेनिया दिसून आला (खूप कमी प्लेटलेट संख्या तीही फक्त १४००० तसेच गंभीर परिस्थितील विकृत यकृत आणि किडनी फंक्शनशी) या परिस्थितीत ताबडतोब रुग्णाला हायर एंड आयसीयु मध्ये उपचार सुरू केले. परंतु एंकदरीत गंभीर स्थिती लक्षात घेत आम्ही रुग्णाच्या पालकांना बोलावून घेत सर्व परिस्थिती समाजावून सांगितली की गंभीर स्वरुपाच्या डेंग्यु तापामध्ये एका मागे एक असे वेगवेगळे अवयव निकामी होण्याचे मोठ्या प्रमाणात चान्सेस आहेत त्यात रुग्णाच्या डोळ्यांना गंभीन ईजा होण्यास सुरूवात झाली होती व काही काळात कान,हात किंवा पाय गमावण्याच्या व जीवही जाण्याच्या भीतीची माहिती देण्यासाठी पालकांना बोलावले आणि पालकांना स्थिती अवगत करून दिलीपरंतु आमच्या टिमच्या ८–९ दिवसांच्या रात्र–दिंवस अशा अथक आयसीयु मधील उपचार व परिश्रमानंतर मध्ये राहिल्यावर रुग्णाने त्याचे डोळे हळू हळू उघडायला सुरुवात केली आम्ही पालकांना कॉल केला आणि रुग्णाची सकारात्मक स्थिती सांगीतली त्यावेळी ते रडत होते, कदाचित त्यांची प्रार्थना कामी आल्याची भावना ते व्यक्त करत असावेत.. पुढील २ ३ दिवसाच्या उपचारानंतर आम्ही रुग्णाचे व्हेंटिलेटर काढले आणि रुग्णास सामान्य आयसीयूत आणले त्यावेळी त्याच्या फुफ्फुसातील संसर्ग कमी झालेला होता त्याची ऑक्सीजनची आवश्यकता सुधारली होती ,प्लेटलेट संख्या व ब्लड प्रेशर स्थिती स्थिर झाली होती आणि इन्फेक्शन पॅरामीटर्स चांगले झाले होते त्यानंतर सर्व प्रकारच्या तपासण्यानंतर शेवटी १५ दिवसांच्या सलग उपचारानंतर आम्ही रुग्णास यशस्वीपणे डिस्चार्ज करू शकलो याचे मोठे समाधान मिळाल्याची भावना डॉ. दुर्गेश यांनी बोलून दाखविली ..डेंग्युचा गंभीर तरुण रुग्ण वाचल्याचा मनोमन आनंद.. टिम यशोदा हॉस्पिटलडेंग्युचा गंभीर तरुण रुग्ण वाचल्याचा आनंद आहे. त्याच्या पालकांच्या मदतीला आम्ही येऊ शकलो याचे समाधान आहे काही दिवसांनंतर आम्हाला



सदरील रुग्णाचा फोन आला आणि मे महिन्यात त्याच लग्न होणार हे कळून आम्हा सर्वांना आनंद झाला गंभीर आजार उपचारासाठी यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे अनिल जोंधळे –९१५४९९५४६३ किंवा किरण बंडे ९१५४१६७९९८ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद च्या वतीने करण्यात आले आहे.

गंभीर डेंग्यू ही एक वैद्यकीय आणीबाणी आहे जी प्राणघातक ठरू शकते..! वारंवार उलट्या होणे. तुमच्या मलमध्ये रक्त किंवा रक्त फेकणे. नाकातून रक्त येणे किंवा हिरड्यांमधून रक्त येणे. अत्यंत थकवा, अस्वस्थता किंवा चिडचिड होते बहुतेक लोक एका आठवड्याच्या आत बरे होतात. काही प्रकरणांमध्ये, लक्षणे खराब होतात आणि जीवघेणा होऊ शकतात. याला गंभीर डेंग्यू, डेंग्यू हेमोरेजिक फिव्हर किंवा डेंग्यू शॉक सिंड्रोम म्हणतात.जेव्हा तुमच्या रक्तवाहिन्या खराब होतात आणि गळती होते तेव्हा गंभीर डेंग्यू होतो. आणि तुमच्या रक्तप्रवाहात गुठळ्या तयार करणाऱ्या पेशींची (प्लेटलेट्स) संख्या कमी होते. यामुळे शॉक, अंतर्गत रक्तस्त्राव, अवयव निकामी होणे आणि प्रसंगी मृत्यू देखील होऊ शकतो .

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ३ लाख ३८ रुपयांचा मुद्देमाल जप्त

## १६ धडक कारवाई

नांदेड : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहितेमध्ये अवैध मद्य जप्त करण्याची धडक कारवाई नांदेड जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. ६ नोव्हेंबर रोजी विभागाने १६ ठिकाणी धाडी टाकून एकूण ३ लाख ३८ हजार ९८० रुपयांच्या मुद्देमालाची दारू जप्त केल्याची माहिती नांदेडचे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक गणेश पाटील यांनी दिली आहे.६ नोव्हेंबर रोजी झालेल्या कारवाईमध्ये विविध ठिकाणी एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. हस्तगत करण्यात आलेल्या जानमालामध्ये एकूण १६ गुन्हे, वारस १६, अटक आरोपी १६, रसायन ४५० लि. देशी मद्य ९४.२० लि., जप्तवाहन संख्या ०३ जप्त असे एकूण सर्व मुद्येमाल ३ लाख ३८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया मुक्त व निर्भयपणे पार पाडावी यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास दक्ष राहण्याचे व आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी आदेश दिले आहेत. त्यानंतर जिल्ह्यामध्ये विभागामार्फत धाडी टाकण्याचे सत्र सुरू आहे. निवडणूक काळामध्ये यामध्ये अधिक वाढ करण्यात आली असून अवैध दारू विक्रीवर विभागाची काटेकोर नजर आहे. जिल्ह्यात आचारसंहिता लागू असून या काळामध्ये कोणीही अवैध मद्य खरेदी करू नये. तसेच स्वत:जवळ बाळगू नये, असे आवाहन विभागाने केले आहे. मद्याचा गैरवापर निवडणूक काळात होत असल्यास या संदर्भात विभागाला नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ९९९९ व व्हॉटसअ‍ॅप क्र. ८४२२००११३३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या कारवाईमध्ये अधिक्षक गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नमाला गायकवाड, जावेद कुरेशी, आशिष महिंद्रकर, सरकाळे यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

# विधानसभा निवडणुकीमुळे प्रशासनाचा वाढला ताण

पुणे : विधानसभा निवडणुकीत प्रशासन व्यस्त असताना कार्तिकी यात्रेमुळे प्रशासनावर दुहेरी ताण येणार आहे. निवडणुकीबरोबरच कार्तिकी यात्रेसाठी आळंदीत येणाऱ्या भाविकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी स्थानिक प्रशासन, खेड तहसील,एसटी महामंडळ,सार्वजनिक बांधकाम विभाग,जिल्हा आरोग्य विभाग, पोलिस आयुक्तालय व्यस्त झाले आहे. या यात्रेसाठी आठ लाख भाविक येण्याचा अंदाज आहे.कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. यात कार्तिकी वारी नियोजनाचा आढावा घेण्यात आला. या वेळी सहायक पोलिस आयुक्त राजेंद्रसिंह गौर,आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त अ‍ॅड.राजेंद्र उमाप, विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे,आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, वाहतुकीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतीश नांदुरकर,दिघी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक विनायक पाटील,वारकरी महामंडळ उपाध्यक्ष डी. डी. भोसले पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे आदी उपस्थित होते.भाविकांच्या सोयीसुविधांबाबत प्राधान्यसदर बैठकीत पाणीपुरवठा,विद्युत, वाहतूक प्रश्न,पथ विक्रेत्यांची व्यवस्था,कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण कारवाई, कायदा व सुव्यवस्था आदी महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तसेच विभागवार आढावा घेण्यात आला. पोलिस बंदोबस्त व पर्यायी मार्गांचा वापर, याबाबत नियोजन करण्यात आले. शहराच्या वेशीवर चारही बाजूंना पार्किंग व्यवस्था व वाहतूक वळविण्याबाबत चर्चा करण्यात आली. भाविकांच्या सोयी सुविधां बाबत प्राधान्याने उपाययोजना करण्याबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या. काय आहेत बैठकीतील मुद्दे? आळंदीत २१ तारखेला पोलिस बंदोबस्त तैनात.आळंदीत वाहनांना २१ नोव्हेंबरपासून प्रवेशबंदी. पासधारक वाहनांना प्रवेश देण्यात येणार. निवडणूक निकालानंतर आळंदीत मिरवणुकी वर बंदी.इंद्रायणीला पाणी सोडण्यात येणार. दर्शनबारी जागेचा प्रश्न तात्पुरता मार्गी. देवस्थानकडून दिंड्यांना राहण्यासाठी जागा.प्रदक्षिणा मार्गावर नो हॉकर्स झोन.२४ तास आरोग्य सुविधा.